18 JUL 2016
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
पुण्यनगरी

# अग्रणी महाविद्यालय म्हणून भारतीच्या फार्मसीची निवड

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**
सलग चौथ्यावेळी अग्रणी महाविद्यालय म्हणून भारती विद्यापीठ कॉलेज ऑफ फार्मसीची निवड करण्यात आली आहे. शिक्षण, संशोधन, कला, क्रीडा, व सांस्कृतिक क्षेत्रात सातत्याने केलेल्या कामगिरीची दखल घेऊन विद्यापीठाने निवड केली आहे, अशी माहिती प्राचार्य डॉ. एच. एन. मोरे यांनी दिली.

२००५ पासून योजना अंमलात आणली. तेव्हापासून उत्कृष्ट निकालची परंपरा व नेटका दर्जा, गुणवत्ता आदी बाबी लक्षात घेऊन अग्रणी महाविद्यालाचा दर्जा दिला आहे. अग्रणी महाविद्यालयामार्फत विद्यापीठ कार्यक्षेत्रातील सर्व फार्मसी महाविद्यालये यांची शैक्षणिक गुणवत्ता उंचावण्याकरिता तसेच वाढत्या स्पर्धेत विद्यार्थी टिकून राहण्याकरिता उपक्रम राबिवले जातात.

केंद्रीय मनुष्यबळ विकास मंत्रालयातर्फे देशात प्रथमच राबिविण्यात आलेल्या 'नॅशनल इन्स्टिट्यूशनल रँकिंग फ्रॅमवर्क' (एनआयआरएफ) च्या क्रमवारीत महाविद्यालयाने देशात २५ वे तर राज्यात ५ वे स्थान मिळवले आहे. शिवाजी विद्यापीठ फार्मसी कार्यक्षेत्रात एन. बी. ए. नवी दिल्लीचे मानांकन मिळालेले एकमेव महाविद्यालय आहे. सध्या महाविद्यालात बी. फार्मसी, एम. फार्मसी, व पीएच. डी.पर्यंत शिक्षण दिले जाते. महाविद्यालयाच्या बी. फार्मसी व एम. फार्मसी या दोन्ही कोर्सनां शिवाजी विद्यापीठाचे निरंतर संलग्नीकरण मिळाले आहे. महाविद्यालाच्या या यशाबद्दल प्राचार्य डॉ. एच. एन. मोरे, अग्रणी महाविद्यालय सचिव प्रा. आर. जे. जरग तसेच सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी यांचे भारती विद्यापीठ, पुणेचे संस्थापक अध्यक्ष डॉ. पतंगराव कदम, भारती विद्यापीठ अभिमत विश्वविद्यालय कुलगुरू डॉ. शिवाजीराव कदम, कार्यवाह डॉ. विश्वजित कदम, मानद संचालक डॉ. एच. एम. कदम यांनी अभिनंदन केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
18 JUL 2016
पुढारी

# कॉलेज ऑफ फार्मसी चौथ्यांदा 'अग्रणी'

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या अग्रणी महाविद्यालय योजनेत सलग चौथ्यांदा भारती विद्यापीठ कॉलेज ऑफ फार्मसी कोल्हापूर अव्वल ठरले. शिक्षण, संशोधन, कला, क्रीडा व सांस्कृतिक क्षेत्रात केलेल्या कामगिरीची दखल घेऊन विद्यापीठाने कॉलेजची अग्रणी महाविद्यालय म्हणून नियुक्ती केली.

केंद्रीय मनुष्यबळ विकास मंत्रालयातर्फे देशात प्रथमच राबविण्यात आलेल्या 'नॅशनल इन्स्टिट्यूशन रँकिंग फ्रॅकवर्क' (एनआयआरएफ) च्या क्रमवारीत कॉलेजने देशात २५ वे, तर राज्यात ५ वे स्थान मिळविले आहे. शिवाजी विद्यापीठ फार्मसी कार्यक्षेत्रात एन.बी.ए. नवी दिल्लीचे मानांकन मिळविलेले हे एकमेव महाविद्यालय आहे. सध्या कॉलेजमध्ये बी. फार्मसी, एम. फार्मसी व पीएच.डी.पर्यंत शिक्षण दिले जाते. महाविद्यालयाच्या बी.फार्मसी व एम. फार्मसी या दोन्ही कोर्सना विद्यापीठाचे निरंतर संलग्नीकरण मिळाले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
18 JUL 2016
पुढारी

# शिवाजी विद्यापीठातर्फे 'केआयटी'ची अग्रणी महाविद्यालय म्हणून निवड

**कोल्हापूर (प्रतिनिधी) :** केआयटी कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगची २०१६ ते २०१९ या तीन शैक्षणिक वर्षांसाठी शिवाजी विद्यापीठातर्फे अग्रणी महाविद्यालय म्हणून निवड करण्यात आली आहे. याबाबतचे पत्र केआयटी महाविद्यालयाला नुकतेच प्राप्त झाले असल्याची माहिती पत्रकाद्वारे देण्यात आली. यापूर्वीही केआयटीला ही जबाबदारी देण्यात आली होती. नॅक ए मानांकित केआयटी महाविद्यालय हे पश्चिम महाराष्ट्रातील प्रमुख अभियांत्रिकी महाविद्यालय आहे. डॉ. आर. बी. हेद्दूर हे समन्वयक म्हणून काम पाहत आहेत. संस्थेचे अध्यक्ष सचिन मेनन, उपाध्यक्ष भरत पाटील, सचिव साजीद हुदली, प्राचार्य डॉ. व्ही. व्ही. कार्जिन्नी, डॉ. एम. एम. मुजूमदार आदींनी याबाबत स्टाफचे अभिनंदन केले.

18 JUL 2016
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

लोकमत

# विद्यापीठाने स्वीकारले १५५ गावांचे पालकत्व

## 'मुनिजन' योजनेअंतर्गत करणार विकास

संतोष मिठारी • कोल्हापूर

विविध विद्याशाखांद्वारे शिक्षण देणाऱ्या शिवाजी विद्यापीठाने कोल्हापूर, सांगली व सातारा जिल्ह्यांतील १५५ गावांचे पालकत्व स्वीकारत सामाजिक बांधीलकीचे पाऊल टाकले आहे. विद्यापीठाने 'मुनिजन' (महाराष्ट्र युनिव्हर्सिटीज न्यू इनिशिएटीव्हज जॉइंट अ‍ॅक्शन नाऊ) योजनेअंतर्गत राष्ट्रीय सेवा योजनेच्या (एनएसएस) माध्यमातून लोकसहभागातून विकास साधण्यासाठी संबंधित गावे दत्तक घेतली आहेत. विद्यापीठाने महाविद्यालयांच्या मदतीने श्रमदानातून या गावांमध्ये बंधाऱ्यांची उभारणी, वृक्षारोपणाची कामे पूर्ण केली आहेत.

विद्यापीठाने कोल्हापूर, सांगली व सातारा जिल्ह्यांतील एनएसएस संलग्नित प्रत्येक महाविद्यालयाच्या माध्यमातून एक गाव पाच वर्षांसाठी दत्तक घेतले आहे. संबंधित महाविद्यालयांच्या माध्यमातून दत्तक घेतलेल्या या गावांमध्ये लोकसहभागातून विकास साधला जाणार आहे. त्यासह श्रमदानातून या गावांच्या शाश्वत विकासासाठी विविध उपाययोजना राबविण्यात येणार आहेत. 'मुनिजन' योजनेअंतर्गत दत्तक घेतलेल्या १५५ गावांमध्ये विद्यापीठाने जानेवारी २०१६ पासून कामाला सुरुवात केली. याठिकाणी 'एनएसएस'च्या निवासी विशेष श्रमसंस्कार शिबिरातून जलसंधारणासाठी एकूण २० बंधाऱ्यांच्या उभारणी केली आहे. त्यासह वृक्षारोपण, ग्रामस्वच्छता, पशुवैद्यकीय चिकित्सा, पाणी आणि मातीपरीक्षण केले आहे. तसेच सौरऊर्जेचा वापर, अंधश्रद्धा निर्मूलन, जलसंवर्धनाबाबत प्रबोधनाचे उपक्रम राबविले आहेत. श्रमदानासह प्रबोधनात्मक उपक्रमांसाठी गेल्या सहा महिन्यांत 'एनएसएस'च्या १२ हजार स्वयंसेवकांनी काम केले आहे. विद्यापीठाने संबंधित महाविद्यालयांच्या माध्यमातून दत्तक घेतलेल्या गावांच्या विकासाचा प्राथमिक आराखडे तयार केले आहेत. यामध्ये संबंधित गावांमधील शिक्षण, आरोग्य, पाणी उपलब्धता, पायाभूत सुविधा, आदींच्या नियोजनाचा समावेश आहे. यासाठी 'एनएसएस'च्या स्वयंसेवकांच्या माध्यमातून सर्व्हेक्षण केले आहे. हे आराखडे मान्यतेसह पुढील कार्यवाहीसाठी शासनाला सादर केले आहेत.

### स्वयंपूर्ण गाव साकारणार

'मुनिजन' योजनेअंतर्गत 'एनएसएस'च्या माध्यमातून संबंधित गावे स्वयंपूर्ण, परिपूर्ण केली जाणार आहेत. शासनाच्या सूचनांनुसार विद्यापीठाने दत्तक घेतलेल्या गावांचा विकास साधला जाणार असल्याचे विद्यापीठाचे 'एनएसएस'चे समन्वयक डॉ. डी. के. गायकवाड यांनी सांगितले. ते म्हणाले, या उपक्रमातून विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक बांधीलकीची मूल्ये रुजविण्याचा विद्यापीठाचा उद्देशही सफल होईल. वर्षभरात महाविद्यालयांतील 'एनएसएस'च्या स्वयंसेवकांच्या माध्यमातून गावांचे सर्वेक्षण करून प्राथमिक आराखडा बनविला आहे.

**जिल्हानिहाय दत्तक गावे**

| जिल्हा | गावे |
|---|---|
| कोल्हापूर | 62 |
| सांगली | 48 |
| सातारा | 45 |

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
18 JUL 2016

पुढारी

# कौशल्याचा योग्य वापर केल्यास ध्येय प्राप्ती : कौस्तुभ बंकापुरे

**कोल्हापूर (प्रतिनिधी) :** आपल्या अंगभूत कौशल्यांचा विकास करण्याबरोबरच अन्य आवश्यक कौशल्ये आत्मसात करून त्यांचा योग्य वापर केल्यास ध्येय निश्चितपणे साध्य करता येते, असा विश्वास कौस्तुभ बंकापुरे यांनी शुक्रवारी विद्यार्थ्यांच्या मनात जागविला. शिवाजी विद्यापीठाच्या कौशल्य व उद्योजकता विकास केंद्रातर्फे जागतिक युवा कौशल्य दिनानिमित्त 'आईस ब्रेकिंग फॉर स्कील डेव्हलपमेंट' या विषयावर बंकापुरे यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. त्यावेळी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्रभारी कुलगुरू डॉ. डी. आर. मोरे होते. प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. जे. एस. बागी प्रमुख उपस्थित होते. डॉ. शिंदे म्हणाले, आजच्या युवा पिढी तंत्रज्ञानाने शिक्षित आहे. यासह कोणतेही नवीन कौशल्य शिकण्याची संधी विद्यार्थ्यांनी सोडता कामा नये. डॉ. मोरे म्हणाले, वाचन, लिखाण याप्रमाणेच श्रवण हीसुद्धा कौशल्यपूर्ण बाब आहे. संभाषण हे तर त्याहूनही महत्त्वाचे कौशल्य आहे. विद्यार्थ्यांनी इंग्रजी भाषेचा बाऊ न करता तिच्या माध्यमातून हे संभाषण कौशल्य विकसित केले पाहिजे. कौशल्य व उद्योजकता विकास केंद्राचे समन्वयक डॉ. ए. एम. गुरव यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. महाराष्ट्र शासनाच्या रोजगार व स्वयंरोजगार विभागाचे सहायक संचालक सचिन जाधव यांनी आभार मानले.

